# शासकीय ग्रंथालय आता गाडगीळ शाळेत

## महापालिका : विश्रामबाग येथून स्थलांतराचा स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय


दै. लोकमत, २३ मे २०१८, बुधवार.

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विश्रामबागवाडा येथे गेल्या पन्नास वर्षांपासून सुरु असलेले शासकीय विभागीय ग्रंथालय शनिवार पेठ येथील न. वि. गाडगीळ शाळेच्या इमारतीमध्ये स्थलांतर करण्याचा मंगळवार (दि.२२) रोजी झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

शासनाचे महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालय १९४८ पासून महापालिके मार्फत चालविण्यात येत होते. शासनाने १९६७ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम संमत करुन अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक विभागनिहाय स्वतंत्र ग्रंथालय स्थापन करण्यात आले. त्यानुसार शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक ग्रंथालयाचे पुणे विभागासाठी ग्रंथालय म्हणून महापालिकेकडे हस्तांतरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासून या ग्रंथालयाचे शासकीय विभागीय ग्रंथालय असे नामकरण झाले.

- या पार्श्वभूमीवर संभाव्य धोका टाळण्यासाठी या ग्रंथालयाचे तातडीने स्थलांतर करणे आवश्यक असल्याचा अहवाल देण्यात आला आहे. त्यानुसार मंगळवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत हे ग्रंथालय शनिवार पेठेतील महापालिकेच्या गाडगीळ शाळेत नाममात्र भाडे करारावर देण्यास मान्यता देण्यात आली.



- या शासकीय ग्रंथालयामध्ये तब्बल ३ लाख ५६ हजार ७५० ग्रंथसंपदा.
- १२ हजारपेक्षा अधिक सभासद आहे.
- तब्बल दोनशे वर्षे जुनी असलेली विश्रामबागवाडा ही ऐतिहासिक वास्तू असून, या वास्तूची मोठी झीज झाली आहे.

- गाडगीळ शाळेतील तळमजला व पहिल मजल्यावरील प्रत्येव १४ खोल्या व सभा ३० वर्षांकरिता देण्यास मान्यता दि आहे.

